भारतात ब्रिटीश सत्ता स्थापन झाल्यानंतरचा कालखंड हा भारतीय इतिहासामध्ये आधुनिक कालखंड म्हणून ओळखला जातो.ब्रिटीश सत्तेच्या स्थापनेनंतर युरोपमधून जी नवी मुल्ये, विचार भारतात आले त्यामुळे एकूणच प्राचीन व मध्ययुगीन विचार परंपरांमध्ये अडकून असलेल्या समग्र भारतीय समाजाची त्या विचार व परंपरांमधून सुटका होऊम भारतीय समाज हा आधुनिक होण्याची प्रक्रिया सुरू झाली असे मानले जाते. ब्रिटीशांनी भारतात नवे आधुनिक विचार आणल्यानंतर ते विचार भारतीय समाजात रुजविण्यासाठी काही भारतीय समाजसुधारकांनी पुढाकार घेतला. त्यामध्ये राजा राममोहन रॉय हे अग्रेसर होते. त्यामुळेच बतुतांश इतिहासकार त्यांचा ष्आधुनिक भारताचे जनकष म्हणून उल्लेख करतात.

पुढे भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पंडित जवाहरलाल नेहरुंच्या नेतृत्वाखाली देशात स्वकियांचे सरकार आले. पंडित नेहरूंनी उद्योग केंद्रित पंचवार्षिक योजनांच्या साह्याने भारतातील भौतिक सुधारणांना गती दिली. त्यामुळे काही इतिहासकार पंडित जवाहरलाल नेहरू यांचाही उल्लेख आधुनिक भारताचे जनकष असा करतात.

राजा राममोहन रॉय व पंडित नेहरू यांचा आधुनिक भारताचे जनक म्हणून गौरव करण्यापूर्वी आधुनिकता ही संकल्पना नीट समजून घ्यावी लागते व त्यानंतरच भारताला आधुनिक बनविण्यासाठी खरे कार्य कुणी पार पाडले हे शोधावे लागते. आधुनिकतेचा अर्थ लक्षात घेऊन आपण तसा शोध घेतला तर भारताला खऱ्या अर्थाने आधुनिक राष्ट्र बनविण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच सातत्याने झटलेले दिसतात आणि त्यांच्याच प्रयत्नांमधून आज थोड्याफार प्रमाणात का होईना भारताचा एक आधुनिक राष्ट्र म्हणून उदय होत आहे. त्यामुळेच आधुनिक भारताचे खरे जनक डॉ. बाबासाहेब आंबेडकरच ठरतात. ही बाब अधिक तपशीलात समजून घेण्यापूर्वी आपणास आधुनिकता ही संकल्पना समजून घ्यावी लागते.

**आधुनिकता :**

आधुनिकता ही संकल्पना निव्वळ कालवाचक संज्ञा नसून ती प्रामुख्याने मूल्यवाचक संज्ञा आहे. लोकशाही, राष्ट्रवाद, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, आंतरराष्ट्रीयवाद अशा कांही विचप्रणालींनी आधुनिकतेला आकार दिला आहे. या विचार प्रणालींमध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, मानवता, विश्वकल्याण, विवेकवाद, वैज्ञानिकता अशा मूल्यांचा समावेश होतो.[१]

एकंदरीतपणे आधुनिकता ही संकल्पना समाजाच्या विचारांशी संबंधित असून कोणताही समाज हा आधुनिक आहे किंवा नाही हे ओळखण्यासाठी त्या समाजाचे विचार तपासले तरी ती बाब लक्षांत येते. बऱ्याच वेळा लोकांमध्ये नवे पोशाख, केशरचना, यंत्रे, वाहने व सुख सोयीची नवी साधने म्हणजे आधुनिकता असा एक सर्वसाधारण समज असलेला दिसतो. आधुनिकतेचा संबंध काही प्रमाणात असा बाह्या (भौतिक) गोष्टीशी पोहोचत असला तरी आधुनिकता मुख्यत: व्यक्तींच्या मूल्यांशीच निगडीत असते. केवळ काळाच्या निकषावर आधुनिकता ठरत नाही. आधुनिक काळात राहणारे लोक जर मुलीचा जन्म अपराध मानत गर्भातच स्त्री भ्रुण हत्या करीत असतील तर ते मध्ययुगीन वा रानटीच ठरतात आणि मध्ययुगीन काळातील शिवाजी, अकबर यांच्यासारखे मध्ययुगीन राज्यकर्ते मध्ययुगाच्या चौकटीत न बसणारी भूमिका घेत असतील तर ते मध्ययुगातील असूनही आधुनिक ठरतात. थोडक्यात सांगावयाचे तात्पर्य हे की आधुनिक ही निव्वळ कालवाचक संज्ञा नसून प्रामुख्याने ती मूल्यवाचक संज्ञा आहे.[२]

वरील आधुनिकता या संकल्पनेच्या परिघात डॉ. आंबेडकरांच्या व्यक्तिमत्वाचा मागोवा घेतल्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विचारांच्या दृष्टीने अत्यंत आधुनिक असलेले दिसतात. डॉ. आंबेडकरांचे उच्च शिक्षण हे युरोप व अमेरिकेत झाले असल्यामुळे त्यांच्यावर पाश्चिमात्य आधुनिक विचारप्रणालींचा पगडा प्रारंभापासूनच होता. त्यामुळे असे उच्चविद्याविभूषित व आधुनिकतावादी डॉ. आंबेडकर भारतात आल्यानंतर येथील मध्ययुगीन रूढी परंपरांमध्ये वावरणाऱ्या तत्कालिन भारतीय सामाजाचे अतिशय दाहक अनुभव जातीयतेच्या रुपाने त्यांना मिळाले. एकीकडे मुंग्यांनाही साखर टाकणारा भारतीय समाज दुसरीकडे त्यांच्याप्रमाणेच असणाऱ्या माणसांना मात्र अतिशय अमानुष वागणूक देत असल्याचे पाहून डॉ. आंबेडकर अतिशय व्यथित झाले. अशा जुनाट व मध्ययुगीन भारतीय समाजाला स्वातंत्र्य, समता, बंधुता या आधुनिक मूल्यांकडे आणण्याचे डॉ. आंबेडकरांचे ध्येय होते. तेच ध्येय त्यांनी संविधानाच्या माध्यमातून साधण्याचा प्रयत्न केला.

**संविधानाच्या माध्यमातून आधुनिक भारताची पायाभरणी:**

भारतीय समाज संस्थेचे आणि या समाजसंस्थेला आधारभूत ठरलेल्या तत्वज्ञान परंपरांचेही ते (डॉ.आंबेडकर) अभ्यासक होते. भारतीय समाजातील सामाजिक, राजकीय, आर्थिक अन्यायाचे चित्र त्यांनी स्पष्ट करून घेतले होते. यासर्व प्रचंड अभ्यासामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भारतीय समाजक्रांती संबंधीची भूमिका पक्की झाली होती. भारतीय समाजात मूलगामी परिवर्तन घाडून यावे, हा समाज विज्ञाननिष्ठ, इहवादी आणि कणावादी व्हावा, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ठामपणे वाटत होते.[३] भारतीय संविधान लागू होण्यापूर्वीचा भारत हा विषमतावादी शिकवण देणाऱ्या मनुस्मृतीचा गुलाम होता. एकूणच भारतीय समाजावर स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या आधुनिक मूल्यांच्या विरोधी असणाऱ्या मनुस्मृतीद्वारे

प्रियदर्शिनी महिला महाविद्यालय,वर्धा


Organized by : Dr. Babasaheb Ambedkar Gondwana University Teacher Association

Scanned with CamScanner

SAI JYOTI

# समाजशास्त्र: एक परिचय

## Sociology : An Introduction

डॉ. प्रदिप मेश्राम
धनंजय सोनटक्के
अशोक बोरकर
राहुल राऊत



SAI JYOTI PUBLICATION
*The way of Light*

Scanned with CamScanner

❖ समाजशास्त्रः एक परिचय
Sociology: An Introduction

❖ © लेखक

❖ प्रथम आवृत्ती- २०१६

No part of this book shall be reproduced, stored in retrieval syst
or translated in any form or by any means, electronic, mechani
photocopying and/or otherwise without the prior writ
premission of the publishers.

ISBN : 978-93-86011-40-4

❖ प्रकाशक व मुद्रकः
श्री. नरेश खापेकर
साई ज्योती पब्लिकेशन
तिन नल चौक, कसारपुरा,
इतवारी, नागपूर ४४०००२
मो. नं. ९७६४६७३५०३
ई-मेल- sjp10ng@gmail.com
वेब साईट- www.saijyoti.in

❖ सेल ऑफिसः
ओम साई पब्लिशर्स आणि डिस्ट्रीब्युटर्स
२९, इंदिरा नगर, टी.बी.वार्डच्या मागे
नागपूर- ४४० ००३
मो. नं. ९९२३६९३५०६
इ-मेल- ospdnagpur@yahoo.com

❖ अक्षर जुळवणीः
हरि ओम कॅम्प्युटर्स, नागपूर
मो. नं. ९६७३५५०७२०

Scanned with CamScanner

# १. समाजशास्त्र परिचय

## Introduction to Sociology

मानवाने नेहमीच आपल्या सामाजिक जीवनाचा व जीवनातील विविध घडामोडीचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रक्रियेत, काळानुसार वेगवेगळ्या ज्ञानशाखा जसे धर्मशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, मानसशास्त्र व नितीशास्त्र इत्यादी उदयास आल्या. ज्यांनी प्रामुख्याने मानवी जीवनाच्या विविध पैलुंचे अध्ययन केलेले आहे.

आधुनिक समाजशास्त्राचा विकास १९ व्या शतकात झालेला आहे. समाजशास्त्र, विशेषतः सामाजिक व्यवस्थेच्या संदर्भात सामाजिक जीवन आणि व्यवहारांचे वैज्ञानिक अध्ययन आहे. सामाजिक व्यवस्था कशी कार्य करते, त्यामध्ये परिवर्तन कसे होते, त्याचे परिणाम होतात व त्यांचा व्यक्तींच्या जीवनाशी कशा प्रकारचा संबंध असतो, हे समाजशास्त्राच्या अध्ययनाचे विषय आहेत.

सामाजिक व्यवहारांचा आधार सामाजिक संबंध आहे व व्यक्ती–व्यक्तींमधील क्रियाप्रतिक्रियांमधून सामाजिक संबंध विकसित होत असतात. या सामाजिक संबंधाच्या प्रतिमानांमधून समाज अस्तित्त्वात येतो जो समाजशास्त्राच्या अध्ययनाचा केंद्रबिंदू आहे.

समाजशास्त्र सामाजिक जीवनाचा अभ्यास एक समष्टीच्या रूपात करते. समाजाच्या विभिन्न घटकांचे व त्यातील परस्पर संबंधाचे अध्ययन समाजशास्त्रात केले जाते.

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

भाग १

संपादक • प्रा. डॉ. राम गोविंद आर्वीकर

# प्रबंध पराग



Scanned with CamScanner

ISBN NO. 978-93-82103-15-8

■

प्रबंध पराग-१

प्रा. डॉ. राम गोविंद आर्वीकर

■

प्रकाशक / मुद्रक
लाखे प्रकाशन
सौ. संध्या चंद्रकांत लाखे
मुकुंदराज पथ, महाल, नागपूर-०२
दूरध्वनी : २७६८८१४

■

© डॉ. राम गोविंद आर्वीकर

■

प्रथमाआवृत्ती

■

अक्षर रचना / मुखपृष्ठ
ऋतुजा ग्राफिक्स
भ्रमणध्वनी : ९०४९९७०६६३

■

मूल्य
३८० रुपये

Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका


संपादकीय निवेदन

प्रस्तावना — १

## विभाग - अ
## वारकरी संतमंडळ

ज्ञानदेवांची अभंगगाथा : विवेचनात्मक अध्ययन — ३५
डॉ. सरोज कविमंडन

श्री नामदेव महाराजांच्या अभंगगाथेच्या संपादन पद्धती — ६४
प्रा. डॉ. राम गोविंद आर्वीकर

श्रीसंत एकनाथ महाराजांच्या अभंगगाथेचा विवेचनात्मक अभ्यास — १०७
डॉ. गुरुप्रसाद पाखमोडे

## विभाग - ब
## वारकरी संप्रदाय आणि संत परंपरा

वारकरी संप्रदाय : विवेचनात्मक अभ्यास — १२७
प्रा. डॉ. सौ. अनिता देशमुख




Scanned with CamScanner

# वारकरी संप्रदाय : विवेचनात्मक अभ्यास

प्रा. डॉ. अनिता देशमुख
मराठी विभाग प्रमुख
प्रियदर्शिनी महिला महाविद्यालय,
वर्धा. ४४२००१

वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व धार्मिक जीवनातील एक महत्त्वपूर्ण संप्रदाय आहे. तसे पाहिले तर अनेक संप्रदाय भारत वर्षात आहेत. महाराष्ट्रातही महानुभाव, दत्त, चैतन्य, अवधूत, रामदासी, नागेश इत्यादी अनेक संप्रदाय आहेत. पण या सर्व संप्रदायांपेक्षाही वारकरी संप्रदाय हा विशेष करुन प्रसिद्धीस आलेला आहे. हा संप्रदाय 'वारकरी संप्रदाय' या नावाने ओळखला जात असला तरी 'भागवतधर्म' या नावानेही हा प्रसिद्ध आहे. याशिवाय विठ्ठल भक्तीचा संप्रदाय म्हणूनही याचा नावलौकिक आहे. या वेगवेगळ्या नावाने हा संप्रदाय ओळखला जात असला तरी 'वारकरी संप्रदाय' याच नावाने तो प्रसिद्ध आहे. या संप्रदायाचे उपास्य दैवत श्री विठ्ठल आहे आणि प्रधान केंद्र पंढरपूर आहे. या शिवाय पैठण, देहू, आळंदी व वारकरी संताची स्थाने ही वारकरी संप्रदायात मोडत असली तरी या संप्रदायाचे प्रधान स्थान व क्षेत्र श्री पंढरपूर हे आहे. हे गाव अतिशय प्राचीन आहे ते आजच्या सोलापूर जिल्ह्यातील असून भीमानदीच्या तीरावर वसले आहे. येथे भीमानदीच्या तीरावर पुंडलिकाची समाधी आहे व श्री विठ्ठलाची स्थापना केलेली आहे यामुळे श्री विठ्ठल, पंढरपूर आणि पुंडलिक या तिघांचे उल्लेख आणि माहात्म्य वारकरी संप्रदायात वारंवार ऐकावयास मिळते. श्री विठ्ठल हा देव, पुंडलिक हा भक्त, भीमा नदी हे तीर्थ आणि पंढरपूर हे क्षेत्र. अशा पद्धतीने विठ्ठल, पुंडलिक व पंढरपूरचे उल्लेख वारकरी पंथात येतात. देव, भक्त, तीर्थ आणि क्षेत्र हे चारही घटक भारत वर्षाच्या धर्म इतिहासात प्रसिद्ध आहेत. भारत वर्षात असंख्य व विपुल तीर्थक्षेत्रे आहेत. त्यांचे माहात्म्य नानाविध पुराणे, स्थळमाहात्म्य, परग्रंथ, इतिहास व धर्म परंपरामधून आढळून येते

Scanned with CamScanner

ISBN NO- 978-81-909640-7-4

**UGC SPONSORED**

# Two Days International Conference

# "SIGNIFICANCE OF MAHATMA GANDHI'S METHODOLOGY IN 21ST CENTURY"

ON

30th & 31st January, 2015



Organized by

Gandhi Study Center

New Art's Commerce & Science College,

Nalwadi, Wardha (M.S.)

Scanned with CamScanner

ISBN NO.: 978-81-909640-7-4

# भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील वर्धा शहराचा सहभाग

प्रा. डॉ.मालीनी मोहन वडतकर
विभाग प्रमुख (राज्यषास्त्र)
प्रियदर्शिनी महिला महाविद्यालय, वर्धा.

**प्रस्तावना :–** इंग्रजांनी अठराषे सत्तावनचा अनुभव व वाढत्या प्रषासकीय सामर्थ्यावर उपाय म्हणून 1861 मध्ये नागपूर आणि सागर – नर्मदा प्रदेषातील मराठी व हिंदी जिल्हयांचा समावेष करणारा सेंट्रल प्रॉव्हिन्सेस हा प्रांत निर्माण केला. 1822 पासून प्रारंभिलेली रिचर्ड जेंकिसनची प्रषासन पध्दती बहुतांषपणे अस्तित्वात होती. कालांतराने इतक्या मोठया भूभागावर जिल्हा प्रषासन करणे गैरसोयीचे होते. प्रषासनात कार्यक्षमता आणण्यासाठी नागपूर जिल्हयात समाविष्ट असलेला वर्धेचा भाग 1862 मध्ये वेगळा करण्यात आला आणि निर्माण केलेल्या जिल्हयाचे मुख्यालय पुलगावजवळ कवठा या गावात ठेवण्यात आले. बऱ्याच मालगुजारांचे इंग्रज अधिकाऱ्यांषी स्नेहाचे संबंध होते. म्हणून इंग्रज सरकारविरूध्द राजकीय वातावरण निर्माण करण्याचे धाडस येथील लोकात झाले नाही. सन 1900 पर्यंत जिल्हयात सरकार विरोधी जागृती निर्माण करणारी एकही संस्था किंवा व्यक्तिमत्व निर्माण झाले नव्हते परंतु नागपूरच्या लोकसभा संस्था व गोरक्षण संस्थेने 1890 पर्यंत वर्धा षहरात राजकीय जागृतीचा सुयोग्य परिस्थिती निर्माण करून दिली होती. वर्धा जिल्हयातील हरिभाऊ केळकर, तपस्वी परांजपे, निळकंठराव देषमुख, पांडुरंग खानखोजे, अभ्यंकर, कदम, देषपांडे कावळे इत्यादी लोकांचा षिक्षणाच्या माध्यमातून नागपूरच्या नेत्यांषी संबंध आल्यामुळे जिल्हयात राजकीय जागृतीस प्रारंभ झाला. याला सन 1891 चे नागपूर व 1897 च्या अमरावती कॉंग्रेस अधिवेषनाने बराच हातभार लावला आणि लोकमान्य टिळकांच्या चतुःसूत्री कार्यक्रमाने प्रभावित झालेला एकगट राजकीय क्षेत्रात अस्तित्वात आला. सन 1902 ते 1905 या दरम्यान खानखोजे यांनी जिल्हयात बऱ्याच क्रांतिकारी गुप्त संघटना स्थापन केल्या आणि 1906 मध्ये क्रांतिकार्यासाठी लश्करी षिक्षण घेण्यासाठी विदेषात इंग्रज विरोधी क्रांतिकार्य चालविण्यासाठी त्यांनी वर्ध्याचे हनुमंत नायडूसह परदेषगमन केले.

**होमरुल चळवळ व असहकार :–** सन 1918 मध्ये लो. टिळकांचा वर्धा जिल्हयातील दौऱ्यामुळे मोरेष्वर अभ्यंकर, डॉ. केदार, खुषालचंद जाजू, मनोहर देषपांडे, त्यांचे विष्वसनीय भक्त बनले. त्यामुळे वर्ध्यात होमरूल कार्यकर्ते उदयास आले. त्यांनी वर्धा, आर्वी, पुलगाव, हिंगनघाट, आश्टी व सिंदी येथे प्रचारकार्यात चालना दिली. म्हणून जिल्हयात 1919 ला होमरूल लीगच्या षाखा व 1920 मध्ये तालुका कॉंग्रेस समिती स्थापन झाल्या. जिल्हयात निर्माण झालेली जागृती फक्त मोठया षहरपर्यंत व विद्याविभुशित लोकापर्यंत मर्यादित होती. खेडयातील सामान्य जनतेपर्यंत राजकीय जागृतीचा षिरकाव झालेला नव्हता कारण इंग्रज अधिकारी व मालगुजाराची जबरदस्त अत्याचारी भीती सर्वत्र पसरलेली होती. सन 1920 नंतर राश्ट्रीय जागृतीच्या परिस्थितीत बदल होत गेला. कारण जमनालाल बजाज सारख्या महान राश्ट्रीय वृत्तीचा मालगुजार वर्धा येथे उदयास आला. यांनी 1916 मध्ये गांधीजींचे दर्षन घेऊन त्यांचे पाचवे पुत्र बनण्याचा मान मिळविला. या लक्ष्मीपुत्राने खादी परिधान करून डिसेंबर 1920 च्या नागपूर कॉंग्रेस अधिवेषनाचे स्वागताध्यक्ष म्हणून तसेच 1923 चा नागपूर येथे अभिनव झेंडा सत्याग्रह यषस्वी करून दाखविल्यामुळे वर्धा जिल्हयाची ओळख देषाला झाली. त्यामुळे धनिक व्यापारी व काही मालगुजार जमनालाल बजाज यांचे अनुयायी बनले. असहकाराच्या चळवळीला जरी यष मिळाले नसेल तरी वर्धा जिल्हयात राजकीय क्षेत्रात षेकडो नेत्यांची नवपिढी उदयास आली. जनतेमध्ये इंग्रज अधिकारी व पोलीसाबाबत असणारी भीती तसेच तुरूंगाची भीती हळूहळू कमीझाली. राश्ट्रीय जागृतीच्या दृश्टीने जिल्हयात हा पहिला परिवर्तनाचा काळ ठरला.

**वर्धा जिल्हयातील रचनात्मक कार्य :–** सन 1921 मध्ये जमनालाल बजाज यांच्या विनंतीवरून महात्मा गांधीनी साबरमती आश्रमातील विनोबा भावे, मगनलाल गांधीसह अनेक कार्यकर्त्यांना वर्धा येथे पाठविले. सन 1921 मध्ये गुढीपाडव्याला वर्धा येथे सत्याग्रहारमाची स्थापना होताच जिल्हयातील नालवाडी, सेलू, नागझरी, रोहिणी, देवळी, भिवापूर, सूरगांव, इत्यादी खेडयात रचनात्मक कार्याला सुरूवात झाली. या सत्याग्रहाश्रमात अस्पृष्यता निवारण, ग्रामसफाई, अंधश्रध्दा निर्मुलन, सुतकताई, कापड विणणे, गोसेवा, कृशीप्रयोग, राश्ट्रीय षिक्षण आणि अनेक ग्रामोद्योगी प्रयोग सुरू झाले. येथील कार्याचा इतर खेडयावर प्रभाव पडणे स्वाभाविक होते. त्यामुळे अस्पृष्यता हळूहळू कमी होत गेल्यामुळे जनतेमध्ये एकतेचे, संघटनात्मकतेच वातावरण निर्माण होण्यास मदत झाली. अषावेळी जमनालालजी यांनी वर्धा षहरातील प्रसिध्द लक्ष्मीनारायण मंदिर 19 जुलै 1928 रोजी हरिजनासाठी खुले केले. कर्मठ विचारसरणीच्या काळात ही घटना फार मोठी होती. त्यामुळे जिल्हयाच्या सामाजिक व धार्मिक परिस्थितीत परिवर्तन येत गेले. या कृतीचे संपूर्ण देषात अनुकरण करण्यात आले. जमनालालजी यांनी मुंबई येथे विलेपार्ले तर जानकीदेवी बजाज यांनी अनेक कार्यकर्त्यासह धारसणा येथे मिठाचा कायदेभंग करण्यासाठी नेतृत्व केले. यांचे अनुकरण येथील लोकांनी करून मीठाचा, भाशणाचा कायदेभंग करून इंग्रजांचा अत्याचार व तुरूंगवास पत्करला. रचनात्मक कार्यकर्त्यांनी जनमत तयार करण्यात जे यष मिळविले. ती नैतिक व सामाजिक सुधारणासाठी नव्हे तर कायदेभंग आंदोलनासाठी अपूर्व कामगिरी होती.

**जमनालालजींचे दातृत्व :–** सेठ जमनालाल बजाज यांचा कॉंग्रेसमधील उदय ही वर्धा जिल्हयाच्या दृश्टीने महत्त्वाची घटना तर होतीच याषिवाय ते दानषूर होते. म्हणून देषातील काही व्यापाऱ्यांचा व कार्यकर्त्यांचा जमघट त्यांच्या बाजूला होता. म्हणून क्रियाषील घटना वर्धा जिल्हयात निर्माण होण्यास मदत झाली. संघटना व संस्था निर्मितीला लागणारी जागा व आर्थिक बळ त्यांनी त्वरीत प्रदान केले. त्यांनी बनारस हिंदू विद्यापीठाच्या मदनमोहन मालवीय ग्रंथालयास 50 हजार रूपये व जे.सी. बोस याच्या षास्त्रीय संषोधन कार्यासाठी कलकत्त्यांच्या एका संषोधन संस्थेला 30 हजार रूपयाची देणगी दिली. रायबहादूर सारख्या सर्वोच्च किताबाचा त्याग करून असहकार चळवळीच्या काळात त्यांनी टिळक फंडासाठी एक लाख रूप्याची देणगी दिली. यासाठी वर्धा जिल्हयाचा दौरा करून 17810 रूपये गोळा करून दिले होते. याषिवाय सत्याग्रहाश्रमाला जमीन दानात दिली. 23 सप्टेंबर 1933 ला महात्मा गांधीचे प्रथम वर्ध्याला आगमन झाल्यावर मगनवाडी त्यांच्या निवासासाठी दान दिली. 1934 मध्ये गांधीजींचे वास्तव्य वर्धा येथे झाल्यावर त्यांची व्यवस्था महिलाश्रमातील बंगल्यात केली. 1936 मध्ये गांधीजी सेवाग्राम येथे कायमचे वास्तव्याला स्थानिक झाल्यावर सुरूवातीला आश्रमासाठी एक एकराचा भाग देऊन आश्रमातील बांधकामे करून दिली. सेगाव (सेवाग्राम) हे जमनालाल यांचे अकरा आण्याचे मालगुजारीचे गाव असल्यामुळे येथील सर्व जमीन व अकरा आणे मालगुजारीचा हिस्सा गांधीच्या आश्रमाला दान करून टाकला.

**वर्धेतील विधायक कार्य :–** सन 1936 पासून महात्मा गांधीचे कायम वास्तव्य सेगाव (सेवाग्राम) येथे झाल्यावर कॉंग्रेस आंदोलनाचे व



Scanned with CamScanner

ISBN - 978-81-929160-8-8

Shri Sant Gajanan Maharaj Shikshan Sanstha

**Shri Sant Gajanan Maharaj Arts College**

Borgaon (Manju) Tq. Dt. Akola

UGC Sponsored

SOUVENIR

# National Conference on

# Women Reservation & Politics In India




## 13th & 14th March 2015

Organized by

**Department of Political Science**

Shri Sant Gajanan Maharaj Arts College,

Borgaon (Manju) Tq. Dt. Akola

Scanned with CamScanner

 ISBN : 978-81-929160-8-8

# महिलांचा राजकारणातील सहभाग आणि विकास

**डॉ. मालीनी मोहन वडतकर**
विभाग प्रमुख (राज्यशास्त्र)
प्रियदर्शिनी महिला महाविद्यालय, वर्धा

**प्रस्तावना :**

राजकारण हे समाजपरिवर्तनाचे एक महत्त्वाचे साधन असल्याने स्त्रियांनी राजकारणात सक्रिय सहभाग घेण्यावर खरी स्त्री - पुरूष समानता आणि स्त्रियांचे या गोष्टी अवलंबून आहेत. समाजपरिवर्तन एकदम होत नसते. समाजपरिवर्तन ही दीर्घ कालावधीची प्रक्रिया आहे. स्त्री ही राजकीय दृष्टीने जेवढी जागरूक होईल, तिचा राजकीय सहभाग जेवढा अधिक वाढेल, स्त्रियांचे राजकीय समाजीकरण जेवढया अधिक प्रमाणात होईल, स्त्रिया ज्या - ज्या वेळी राजकारणात सक्रिय झाल्यात, संसदेत संसद सदस्य म्हणून ज्या वेळी त्या हिरिरीने कार्य करू लागल्या त्या त्या वेळी समाजातील स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाकडे त्या राजसत्तेचे लक्ष आकृष्ट करू शकल्या व त्या अन्यायविरूद्ध कठोर उपाययोजना करायला राजसत्तेला भाग पाडू शकल्या.

भारतामधील हुंडाबळीसारखे प्रश्न राज्यकर्त्यांच्या नजरेला आणण्यात भारतातील स्त्री सांसद फार मोठ्या प्रमाणात यशस्वी झाल्या आहेत, हे नाकारता येत नाही.

राजकारण हे धकाधकीचे क्षेत्र असते. खटनटाशी या पद्धतीने राजकारण चालत असते. ते आपले क्षेत्र नाही अशी उदासीनतेची भूमिका स्त्रियांत असते. त्यासाठी अनेक कारणे सांगितली जातात. राजकीय पक्षात होणारी आपापसांतील विधिनिषेधशून्य स्पर्धा, राजकीय पक्षाकडून स्त्रियांना स्वभावातःच घृणा वाटत असते आणि त्यापासून दूर राहणेच त्या अधिक पसंत करतात. त्याऐवजी अन्य सामाजिक सांस्कृतिक किंवा धार्मिक स्वरूपाच्या विधायक कार्यक्रमात सहभागी होण्याची प्रवृत्ती स्त्रियांत अधिक प्रमाणात असते. त्यामुळे राजकारण आधि विशेषतः स्वतंत्र देशातील राजकारण हे केवळ राजकारणाचा धंदा व व्यवसाय करण्याचेच कार्यक्षेत्र होऊन बसते. परंतु, राजकारणाबद्दलची अशी उदासीनता दाखवून इतःपर स्त्रियांना चालणार नाही. इतर क्षेत्रांत बुद्धिमान आणि कर्तृत्ववान स्त्रियांनी आजच्या काळात आघाडीवर राहण्याचे प्रयत्न करणे ही आजच्या दृष्टीने आवश्यक बाब आहे.

काही विशिष्ट मूल्ये उराशी बाळगून आपले व पर्यायाने समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी फार मोठया प्रमाणात राजकारणाच्या क्षेत्रात स्त्रीने अग्रेसर झाले पाहिजे. निवडणुकांच्या राजकारणातून जन्माला आलेला भ्रष्टाचार, गुन्हेगारी प्रवृत्ती आणि काळया पैशाचा सर्वव्यापी संचार या दुष्ट चक्रातून राजकारणाला मुक्त करायचे असेल तर राजकारणात मोठया संख्येने सक्रिय सहभाग घ्यायला स्त्रियांनी पुढे आले पाहिजे आणि त्यांना प्राप्त झालेल्या सर्व क्षेत्रांतील समान संधीच्या अधिकारांचा जाणीवपूर्वक आणि प्रयत्नपूर्वक वावर करायला पाहिजे. स्त्रीने हे कधीही विसरता कामा नये की, समाजातील प्रत्येक प्रश्न हा अंतिमतः स्त्रियांचा प्रश्न असतो आणि म्हणून राजकारणाचे क्षेत्र हे स्त्रीने आपले प्रश्न सोडविण्याचे महत्त्वाचे क्षेत्र मानून राजकारणाच्या साधनाचा वापर करून समाजाला पवित्र आणि मंगलमय करण्यासाठी एक नव्या जोमाने या क्षेत्रात पदार्पण करून मोठया संख्येने पुढे आले पाहिजे.

"The entry of women in politics would create enboling, purifying, atmosphere in assembley."

हया स्त्रियांच्या राजकारणातील प्रवेशाचा पुरस्कार करण्याच्या आशावादाचे मर्म स्त्रीने ओळखले पाहि . केवळ ५०% राखीव जागांवर समाधान मानण्याच्या कृतीचा स्त्रीने इतःपर त्याग केला पाहिजे.



Scanned with CamScanner

Maharashtra Political Science and Public Administration Conference
Reg.No. MAH / 12-83 / Aurangabad F - 985

Volume - 2 No. 1 Jan., 2015 ISSN No. 2347-9639

# VICHAR MANTHAN

– National Research Journal of Political Science and Public Administration
(Peer Reviewed Journal)




महाराष्ट्र राज्यशासन व लोकप्रशासन
परिषदेची संशोधन पत्रिका

# विचार मंथन

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. पी.डी. देवरे
सहसंपादक : प्रा. मनोहर पाटील | संपादक : डॉ. प्रमोद पवार

अथर्व पब्लिकेशन्स

Scanned with CamScanner

# २०१४ च्या लोकसभा निवडणुका : विश्लेषण व परिणाम

– प्रा. डॉ. मालिनी मोहन वडतकर
राज्यशास्त्र विभागप्रमुख, प्रियदर्शिनी महिला महाविद्यालय, वर्धा – ४४२००१

**प्रस्तावना**

गेल्या दहा वर्षांत देशात झालेल्या आर्थिक व सामाजिक परिवर्तनाच्या परिणामी राजकीय प्रक्रियेत सर्व घटकांचा वाढलेला सक्रिय सहभाग, हे या वर्षीच्या १६ व्या लोकसभा निवडणुकीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य मानायला कुणाचीही हरकत नसावी.

तसे पाहिले तर ही संपूर्ण मानवी इतिहासातील सर्वात मोठी निवडणूक आहे. यापूर्वी जगात कुठेही, कधीही ८२ कोटी मतदारांनी त्यांची संसद निवडण्यासाठी मतदान केलेले नाही. संपूर्ण अमेरिका खंड आणि जवळजवळ सर्व युरोप खंडाच्या एकूण लोकसंख्येइतके मतदार भारतात आहेत. ७ एप्रिलला सुरू झालेली ही प्रक्रिया १२ मेपर्यंत ९ टप्प्यांत ३५ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातून ५४३ खासदार निवडण्यासाठी अतिशय उत्साहात पार पडली आहे. प्रत्येकी सुमारे १५ लाख मतदारांच्या समूहाने त्यांच्यासाठी एक खासदार निवडून १६ व्या लोकसभेत पाठवला आहे.

UPA सरकारच्या गेल्या १० वर्षांतील राजवटीत झालेल्या विकासामुळे अनेकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावलेला आहे, तरीही मतदार समाधानी नाहीत, हेच विविध मतदान चाचण्यांत दिसून आले आहे. एका पाहणीनुसार प्रत्येकी १० मतदारांपैकी ८ जण देशाच्या आर्थिक प्रगतीबाबत समाधानी नाहीत.

भारतातील पक्षांची संख्या १५०० पेक्षा जास्त असून त्यातील प्रादेशिक पक्षांना निम्म्या मतदारांची मते मिळतात. देशातील निम्म्या राज्यात अशा पक्षांची सत्ता आहे. उर्वरित निम्मे मतदार राष्ट्रीय स्तरावरच्या दोन आघाड्यांना पाठिंबा देतात. त्यापैकी काँग्रेसप्रणीत UPA आघाडीने देशावर ६७ पैकी ५४ वर्षे राज्य केलेले आहे. भाजपाप्रणीत NDA आघाडीने केंद्रात ६ वर्षे राज्य केले असले तरी अनेक राज्यांमध्ये भाजप व तिच्या घटक पक्षांची सत्ता २५ वर्षांपेक्षा जास्त काळ आहे. भाजपला उत्तर व पश्चिम भारतीयांचा नेहमीच प्रचंड पाठिंबा मिळालेला आहे.

मार्च ते मे २०१४ दरम्यान ९ टप्प्यांत पार पडलेली सोळाव्या लोकसभेची निवडणूक ऐतिहासिक होती. ५४३ सदस्यांच्या लोकसभेत एनडीएने ३३६ जागा जिंकल्या. भाजप ११६ जागांवरून २८२ वर पोहोचला. गेल्या ५ वर्षांत भाजपची लोकसभेतील ताकद दुप्पट झाली आणि ३० वर्षांनंतर पहिल्यांदाच केंद्रात एखाद्या पक्षाला बहुमत मिळाले. काँग्रेस पक्ष २०६ वरून ४४ वर घसरला. आम आदमी पार्टीला तर केवळ ४ जागा मिळाल्या. काँग्रेस नेतृत्वाखालील युपीए सरकारविरूद्ध जनमानसात असलेल्या नाराजीची तीव्रता या निकालात प्रतिबिंबित झाली.

नरेंद्र मोदी बडोद्यात ५.७० लाख तर वाराणसीत ३.५० लाखांहून जास्त मताधिक्क्याने निवडून आले. त्यांच्या नेतृत्वामुळे स्वातंत्र्यानंतर प्रथमच भाजपने स्वबळावर बहुमताचे (२७२) संख्याबळ गाठले, तर काँग्रेसला प्रथमच २ अंकी संख्येवर समाधान मानावे लागले.

इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर १९८४ मध्ये निर्माण झालेल्या सहानुभूतीच्या लाटेत काँग्रेस पक्षाला ४१५ जागांचा प्रचंड लोकमताचा कौल मिळाला होता. त्यानंतर १९८९ मध्ये विश्वनाथ प्रतापसिंह यांचे आघाडीचे सरकार होते. इतर राजकीय पक्षांपेक्षा १९९१ मध्ये काँग्रेसला सर्वाधिक म्हणजे २४४ जागा मिळाल्या, परंतु बहुमत मिळाले नव्हते. सर्वाधिक जागा मिळविणारा पक्ष या नात्याने नरसिंह राव यांना सरकार स्थापनेची संधी मिळाली. यानंतरही सातत्याने आघाडीचीच सरकारे सत्तेत आली. एच.डी. देवगौडा व इंद्रकुमार गुजराल यांच्या नेतृत्वाखालील सरकारे, अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार व त्यानंतर काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार ही सर्व आघाडीची सरकारे राहिली. यामध्ये प्रमुख किंवा नेतृत्व करणाऱ्या पक्षालादेखील २७२ ही संख्या गाठता आली नव्हती. मात्र २०१४ मध्ये स्वबळावर ही संख्या पार करण्याचे यश भाजपने साध्य केले.

भारतीय मतदार सध्या राजकीय प्रक्रिया व अपेक्षांबाबत खूपच आक्रमक झालेला आहे. त्याच्या राजकीय जाणिवा नको तेवढ्या स्पष्ट आहेत. याला अनेक घटक मुख्यत्वे कारणीभूत आहेत; त्यापैकी पुढील घटकांचा विचार या ठिकाणी करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

### १) युवकांची वाढती संख्या

२०११ च्या जनगणनेनुसार भारताची निम्मी लोकसंख्या २६ वर्षांखालची आहे. ४० वर्षांखालील मतदारांची संख्या एकूणात निम्मी म्हणजे ४१ कोटी आहे. या पिढीला १९९१ च्या पूर्वीची गरिबी/आर्थिक कुंठितावस्था माहीत नाही. १९९१ पूर्वीच्या मानाने सध्याची प्रगती बरीच चांगली आहे, पण सध्याच्या तरुणाईला ती



Scanned with CamScanner

# DR. BABASAHEB AMBEDKAR: VISION AND 21st CENTURY



Editor
Pradeep Hadke

Scanned with CamScanner

१४२. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाही विषयक विचार ....... 423
प्रा.डॉ.मिलिंद कांबळे, प्रा. दशरथ महाकाळे

१४३. लोकशाही आणि सामाजिक परिवर्तन - डॉ. आंबेडकरांचा दृष्टिकोण ....... 425
प्रा. बी. एच. मेश्राम

१४४. धर्मनिरपेक्षता आणि सर्वसमावेशक समाजरचना ....... 427
डॉ. विनोद जीवनतारे

१४५. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे समाजवादी विचार ....... 430
प्रा.डॉ.राजीव कळसकर

१४६. स्व आणि समाजपरिवर्तन : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टीकोन ....... 431
प्रा. रमेश एम. घोनमोडे

१४७. डॉ. आंबेडकर आणि आदर्श लोकशाही ....... 433
डॉ. रमेश पाटील

१४८. डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे कामगार चळवळ विचारदर्शन ....... 436
डॉ. प्रशांत एम. पाटील

१४९. २१ व्या शतकातील सर्व धर्म व्यवस्थांना पर्यायी आंबेडकरांचा धम्म ....... 439
डॉ. प्रियराज महेशकर

१५०. सामाजिक क्रांतीचे अग्रदुत - डॉ. बाबासाहेब आंबेडकर ....... 441
प्रा. शिवचरण नामदेवजी धांड

१५१. वैचारिक संघर्षातील मध्यम मार्ग 'पुणे करार' ....... 443
प्रा. अरविंद म. पुनवटकर

१५२. शेतकऱ्यांचे दिपस्तंभ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर ....... 446
प्रा. डॉ. गोपीचंद या. कठाणे

१५३. समता संवर्धन : डॉ. बाबासाहेब आंबेडकर ....... 448
प्रा. हेमंत एस. गजाडीवार, डॉ. निरज टी. खोब्रागडे

१५४. धर्मनिरपेक्षता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार ....... 450
प्रा. सरला व. मेश्राम

१५५. भारतीय संघ-राज्यवित्त व्यवस्था ....... 452
प्रा. गौतम भ. धुळधुळे

१५६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर - सामाजिक समता आणि समाज परिवर्तनाची दिशा ....... 454
प्रा. चतुरदास जानबा तेलंग

१५७. डॉ. आंबेडकर : उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेची कसोटी ....... 457
प्रा. आर.जी. वानखडे

१५८. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणाविषयी विचार ....... 459
प्रा. डॉ. नितीन बावळे

१५९. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार ....... 461
प्रा. बादलशाहा डोमाजी चव्हाण

१६०. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक धोरण ....... 463
प्रा. राजकुमार भगत

१६१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे २१ व्या शतकातील शैक्षणिक विचार ....... 466
प्रा. रेवाराम माणिकरावं मालखेडे

१६२. डॉ. आंबेडकरांची शिक्षणाविषयी भुमिका एक चिकित्सक अध्ययन ....... 468
डॉ.नामदेव हटवार

Scanned with CamScanner

# २१ व्या शतकातील सर्व धर्म व्यवस्थांना पर्यायी आंबेडकरांचा धम्म

डॉ. प्रियराज महेशकर
प्रियदर्शिनी महिला महाविद्यालय, सावित्रीबाई फुले ज्ञानमार्ग,वर्धा

१४ आक्टोबर१९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लाखो अनुयायांना ज्या बौद्धधम्माची दीक्षा दिली, तो बौद्ध धम्म हा पारंपरिक बौद्ध धर्मापेक्षा वेगळा आहे. डॉ. आंबेडकरांनी जवळपास सहा वर्ष खर्ची करुन रचलेल्या 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या मुळच्या इंग्रजी ग्रंथामधून आंबेडकरप्रणित बौद्ध धम्माची मांडणी आलेली असून त्यातून त्या धम्माचे वेगळेपण लक्षात येते. आंबेडकरप्रणित बौद्ध धम्मात काळानुरुप आवश्यक व्यावहारिक बदल तर्कसंगत, बुद्धिप्रामाण्यवादी व विज्ञाननिष्ठ भूमिका घेऊन केलेले दिसतात. त्यामुळे स्वत: आंबेडकरांनीच आपल्या या नव्या बौद्ध धम्माला 'नवयान' संबोधले होते.१

यशवंत मनोहर, राजा ढाले यांच्या सारख्या आंबेडकरी विचारवंतानी तर आंबेडकरांचा बौद्ध धम्म हा परंपरागत बौद्ध धर्मापेक्षा तर वेगळा आहेच पण तो संपुर्ण जगातील 'धर्म' व्यवस्थेला पर्याय उभा करणारा असल्याचे मत प्रभावीपणे मांडलेले आहे. त्यांच्या मते, आंबेडकरांनी धर्मांतर केले म्हणजे हिंदू धर्माचा त्याग केला परंतु हिंदू धर्माचा त्याग करून त्यांनी पुन्हा दुसरा कुठलाही 'धर्म' स्वीकारलेला नसून 'धम्म' स्वीकारलेला आहे. या अर्थाने १९५६ चे धर्मांतर म्हणजे आंबेडकरांचे आपल्या अनुयायांसह धर्मातीत किंवा धर्मविहीन होणे होय.२ या अर्थाने त्यांनी नव्या धम्माची केलेली उभारणी व त्याचा केलेला सामुहिक स्वीकार ही बाब आपल्या विद्यमान जगाला सर्वस्वी अपरिचित, अपूर्व नि अद्‌भूत अशी होती. जगात 'धर्म' संज्ञेला अनेक पर्याय सापडतील पण 'धम्म' या संज्ञेला पर्याय सापडणारच नाही. जगात धर्म अनेक आहेत परंतु 'धम्म' मात्र एकच आहे तो म्हणजे बुद्ध आंबेडकरांचा 'धम्म' त्यामुळे 'धम्म' हा केवळ ब्राम्हणी हिंदू धर्मावरील इलाज नसून तो विद्यमान एकविसाव्या शतकातील सर्वच धर्मावरील इलाज आहे.

धर्म आणि धम्म यातील मुलभूत भेद सांगावयाचा झाल्यास तो पुढीलप्रमाणे सांगता येतो; धर्माचा संबंध देवाशी आहे तर धम्माचा मानवाशी, धर्म अपरिवर्तनीय असतो तर धम्म हा परिवर्तनशील असतो. धर्मात ग्रंथप्रामाण्याला स्थान आहे तर धम्मात बुद्धिप्रामाण्याला. धर्म हा माणसाला बद्ध करतो तर धम्म हा मानवाला मुक्त करतो. धम्म म्हणजे स्वातंत्र्य तर धर्म म्हणजे बंधन वा पराधिनता. धर्माला देवाचे बंधन असते तर धम्माला नैतिकतेचे. नीती नसेल तिथे धम्म नसेल किंबहुना जिथे देव आहे तिथे धम्म नाही.४

डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत बौद्ध धम्माचा मुख्य पायाच नीतिमत्तेवर आधारलेला आहे. धम्म म्हणजेच नीती व नीती म्हणजेच धम्म होय. त्यामुळे धम्माचरण करणे म्हणजे दुसरे तिसरे काहीही नसून नीतिमत्तेने वागणेच होय. नीतिमत्तेने वागणारा समताधिष्ठित समाज असेल तर साम्यवादासारख्या हिंसक व हुकूमशाही व्यवस्थांची गरज राहणार नाही असा दावाचा आंबेडकर करतात.५

डॉ. आंबेडकरांचा धम्म हा पारलौकिक जीवनासाठी नसून तो ईहलौकिक जीवनासाठी आहे. बुद्ध हा वैयक्तिक मोक्षदाता नसून तो संपूर्ण समाजाला मार्ग दाखविणारा मार्गदाता आहे. मानवी समाजाला मुक्तीचा मार्ग दाखविणारा एक इतिहासपुरूष म्हणून आंबेडकरांनी बुद्धाला उभे केले आहे. आंबेडकरांचा बौद्ध धम्म हा निरिश्वरवादी, अनात्मवादी, भौतिकवादी, बुद्धिप्रामाण्यवादी तसेच परिवर्तनवादी आहे.

डॉ. आंबेडकरांचा बुद्ध हा जरा, व्याधी आणि मृत्यू यासारख्या नैसर्गिक दु:खाच्या निवारणार्थ परिव्रज्यक बनलेला नसून वर्गावर्गातील कलहातून, संघर्षातून निर्माण होणाऱ्या सामाजिक दु:खाच्या निवारणाचा मार्ग दाखविण्यासाठी परिव्रज्यक बनलेला आहे. त्याने सामाजिक दु:ख निमुर्लनासाठी लोक प्रबोधन करण्यात आपले जीवन खर्ची घातलेले आहे.६

पारंपारिक बौद्ध धर्मात सांगितली जाणारी दु:ख केंद्रित चार आर्य सत्ये बुद्धाच्या आचारतत्वांना निराशावादी बनवितात. त्यामुळेच डॉ. आंबेडकर पारंपरिक बौद्ध धर्मातून सांगितल्या जाणाऱ्या चार आर्यसत्यांबाबत साशंकता घेत 'दु:ख' या शब्दाचा अर्थ दारिद्र्य आणि कर्ज अशा भौतिक स्वरूपाचा लावतात. दारिद्र्यातून दु:ख निर्माण होते. सामाजिक व आर्थिक परिस्थितीतून दु:ख निर्माण होते असे विश्लेषण डॉ. आंबेडकर करतात. त्यांच्या प्रतिपादनाचा हेतू हाच की, माणसाला त्याच्या दारिद्र्य व इतर भौतिक स्वरूपाच्या दु:खातून मुक्तीचा मार्ग सांगणारे बौद्ध तत्त्वज्ञान असून त्यायोगे ते माणसांमध्ये आशावाद निर्माण करणारे आहे.७

आत्म्यावर आधारित ब्राम्हणी कर्म सिद्धांत आंबेडकरी बौद्ध धम्म नाकारतो. मनुष्याने कुशल म्हणजे समाजहितकारक कर्मे केली तर त्याचा परिणाम नीतीच्या वृद्धीला पोषक होतो. उलट अकुशल म्हणजे अनैतिक कर्मांचा परिणाम वाईट होतो. मात्र कर्त्याच्या नशिबाशी कर्माचा काही संबंध नाही. कर्माचा परिणाम ते कर्म करणाऱ्यालाच भोगावा लागेल असेही नसून एकाच कर्माचा वाईट परिणाम समाजातील अनेकांना भोगावा लागतो. यादृष्टीने कर्म नियम अटळ आहे असा बुद्धाच्या कर्मवादाचा अर्थ आंबेडकरी बौद्ध धम्म सांगतो.८

पुनर्जन्मासंबंधीही अतिशय विज्ञानवादी भूमिका आंबेडकरी बौद्ध धम्मातून आलेली आहे. मानवाच्या मृत्युनंतर त्याच्या शरीरातून उत्सर्जित होणाऱ्या पृथ्वी, आप, तेज, वायु या द्रव्यांचे मुलद्रव्यात विलीनीकरण होते. याच मुलद्रव्यांच्या संयोगातून पुन्हा नवे जीव निर्माण होतात. असा बुद्धाने मांडलेल्या पुनर्जन्माचा अर्थ आंबेडकरप्रणित बौद्ध धम्मातून आला आहे.९

'निब्बाण' (निर्वाण) ही बौद्ध धर्मिय संकल्पना अतिशय साध्या सोप्या पद्धतीने आंबेडकरांनी स्पष्ट केली आहे. 'निब्बाण' म्हणजे मोक्ष, ईश्वरप्राप्ती किंवा स्वर्गप्राप्ती असे कांहीही नसून मानवी मनात असलेल्या लोभ, कोध, द्वेष, मत्सर, कृपणता, ढोंग, कपट, उद्धटपणा, गर्व, सुस्तपणा या विकारांपासूनची मुक्ती होय. निब्बाण ही अवस्था मनुष्याला जिवंतपणीच प्राप्त करता येते

ISBN-978-81-925424-9-2

Scanned with CamScanner

Yeshwant Gramin Shikshan Sanstha, Wardha

**Yeshwant Mahavidyalaya**

Seloo, Dist. Wardha

NAAC Accredited Grade 'B'

Dept. of Physical Education

UGC Sponsored

One Day National Level Seminar On

# Stress Management and Sports Psychology



**Seminar Selections**

**2nd December 2014**

ISBN - 978-93-823[illegible]484

Scanned with CamScanner

# STRESS MANAGEMENT OF WOMEN EMPLOYEES-THE LIVING PARADOX

**Sonali Sirbhate (Ass.profesor)**
HOD.Physical Education & sports
Priyadarshini Mahila Mahavidhyalaya,
Wardha.

**Abstract** - Stress has become a major feature of modern living ,caused particularly by changes in the type of work that the modern women employee does .The status of women in modern India is a sort of a paradox, if on one hand she is at the peak of ladder of success, on the other hand she is mutely suffering the psycho-physiological disturbances & because of that she is enclosing herself in the cage of "stress".

Stress is the psychological and physiological reaction that takes place when one perceives an imbalance in the level of demand placed on the capacity to meet that demand on individuals.

**Key words** –paradox, deterioration, acute stress, chronic stress

**Introduction-**

What is the cost of workplace related stress to the employer- largely - ignored in India? Productivity of the employee will go down. Stress leads to personal conflicts & deterioration of workplace culture because nobody wants to work in a depressing and stressful environment · For people who stay in their jobs in a country indirectly affects the morale and productivity of other employees Dampens innovation and creativity. Eventually loses employees like India where people do not change jobs often, people are more prone to diseases as a result of work stress. Most of the companies do not have an open culture, hence the women never get a chance to speak up their concerns and as a result their concerns never get addressed and they continue to be stressed. These concerns can later result in later in them losing the job or leaving voluntarily, or this might cause trouble for them in their domestic life.

**Types of stress-**

**Acute stress**

Acute stress is the most common form of stress among humans worldwide. Acute stress deals with the pressures of the near future or dealing with the very recent past. This type of stress is often misinterpreted for being a negative connotation. While this is the case in some circumstances, it is also a good thing to have some acute stress in life. Running or any other form of exercise is considered an acute stressor. Some exciting or exhilarating experiences

[Yeshwant Mahavidyalaya, Seloo]

Scanned with CamScanner

chapter in a Book.

2015

# स्त्री भ्रूणहत्या आणि स्त्रियांवरील वाढते अत्याचार

## एक सामाजिक समस्या



प्राचार्य डॉ. सं.ना. भारंबे
डॉ. साधना जावळे

प्रशांत पब्लिकेशन्स्
Prashant

Scanned with CamScanner

# स्त्री भ्रूणहत्या आणि स्त्रियांवरील वाढते अत्याचार : एक सामाजिक समस्या

**प्रकाशक व मुद्रक**
श्री. रंगराव पाटील
**प्रशांत पब्लिकेशन्स**
३, प्रतापनगर, श्री संत ज्ञानेश्वर मंदिर रोड,
नूतन मराठा महाविद्यालयाजवळ,जळगाव-४२५००१.
☎ (०२५७) २२३५५२०,२२३२८००
Website : www.prashantpublications.com
E-mail : sales@prashantpublications.com

**प्रथमावृत्ती :** १४ मार्च २०१५

ISBN : 978-93-85021-90-9

© लेखकाधीन

**अक्षरजुळणी**
प्रशांत पब्लिकेशन्स

**मूल्य :** ₹ ३२५/-

या पुस्तकाचे सर्व अधिकार लेखकाधीन असून, या पुस्तकातील कोणताही मजकूर, तक्ता किंवा तत्सम संकल्पना यांची कोणत्याही प्रकारे नक्कल करणे किंवा यांत्रिकी साधनांनी फोटोकॉपी, रेकॉर्डिंग करणे कायद्याने गुन्हा असून, असे आढळून आल्यास तत्काळ कारवाई करण्यात येईल.



Scanned with CamScanner

# पितृसत्ता, जात, जमातवाद आणि स्त्रियांवरील हिंसा : एक समाजशास्त्रीय आकलन

प्रा. डॉ. धनंजय सोनटक्के
समाजशास्त्र विभाग प्रमुख
प्रियदर्शिनी महिला महाविद्यालय, वर्धा.

२० व्या शतकात वेगवेगळ्या विचार प्रणालीमध्ये झालेल्या तात्विक संघर्षामुळे तसेच लागलेल्या नव-नव्या शोधामुळे समाजात उलथापालथ झाली. १९ व्या शतकातील 'साम्यवाद' व २० व्या शतकातील 'स्त्रीवाद' यांनी जगाला हादरे देत वादळे निर्माण केली ती अजुनही शमलेली नाहीत. 'भांडवलवाद' व 'पितृसत्ता' ह्या धर्म, पंथ, जात या पलिकडे जाऊन सर्वत्र स्थिर झाल्या आहेत व या दोन्ही व्यवस्था जगाला आव्हान देत आहेत. भारतीय स्त्रियांवरील वाढत्या अत्याचाराचे मूळ येथील पितृसत्ता, जात व जमातवादामध्ये रुजलेल्या आहेत. भारतीय स्त्री ही एक स्वतंत्र व्यक्ती नसून ती या विविध सत्तांमधील 'शोषित' व्यक्ती आहे. समाज व्यवस्थेत पूर्वापार अशी विचारधारा अस्तित्वात होती की स्त्रियांचे म्हणून जे काही प्रश्न आहेत ते खाजगी स्वरुपाचे आहेत, परंतु स्त्रीवादी चळवळीने 'स्त्रियांच्या समस्या ह्या खाजगी नसून त्या राजकीय/सार्वजनिक'[१] आहेत ही मांडणी केली. जसे हुंड्यासाठी होणारी हिंसा ही त्या कुटुंबाची खाजगी बाब नसून सार्वजनिक बाब आहे.

स्त्रियांवरील अत्याचार, हिंसा ह्याबाबत बोलतांना कुटुंबाच्या चौकटीतील घरगुती हिंसाचार, हुंडाबळी या प्रश्नांवरची चर्चा होतांना दिसते पण स्त्रियांवरील सार्वजनिक जीवनातील हिंसा व त्यामागील जात, धर्म, जमातवादाची पार्श्वभूमी याकडे दुर्लक्ष होते परंतु या घटकांचा हिंसेशी असणारा संबंध अभ्यासणे अत्यंत आवश्यक आहे. सर्वच स्तरातील, जातीतील स्त्रियांवरील हिंसेचे स्वरुप वेगवेगळे असते हे खैरलांजी हत्याकांडावरुन[२] तसेच राष्ट्रीय अपराध नोंदणी संस्थाद्वारा उपलब्ध आकडेवारीवरुन स्पष्ट होते.

## स्त्रियांवरील हिंसा व तिचे स्वरुप :

हिंसेचे मूळ म्हणजे पितृसत्ताक पध्दत आणि स्त्री पुरुषांमधील असमानता होय. हिंसा या शब्दाची व्याख्या खून, मारणे, इजा करणे अशी मराठी शब्दकोषात केली आहे. वेगळ्या शब्दात सांगायचे तर हिंसा म्हणजे माणसाच्या भौतिक



Scanned by CamScanner
Scanned with CamScanner